नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २२६ Issue - 226 | वार गुरुवार दि. २ जानेवारी २०२५ Blow- Thursday Date 2 January 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# स्कॉर्पिओ-आयशरचा भीषण अपघात; चार भाविकांचा जागेवरच मृत्यू

## अक्कलकोट-गाणगापूर रस्त्यावरील घडली दुर्घटना, ८ जण गंभीर जखमी

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अक्कलकोट,प्रतिनिधी : श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेऊन गाणगापूर येथे देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या स्कॉर्पिओ कारला आयशर ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये चार जणांचा जागेवरच मृत्यू झाला. याशिवाय आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. यासंदर्भात योगेश्वर गंगाधर कुर्णापल्ले (वय २० तालुका खेड जिल्हा पुणे )यांनी दक्षिण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.





या अपघातात हनमल्लू गंगाराम पाशावर वय ३५ राहणार कुंडलवाडी जिल्हा नांदेड गंगाधर राजेंना कोरोना पल्ले व ४५ राहणार केरूळ तालुका बिलोली जिल्हा नांदेड सागराबाई गंगाराम करून आपले राहणार केरूळ तालुका बिलोली जिल्हा नांदेड वैष्णवी उर्फ ऐश्वर्या अनमोल पाशावर वय १४ राहणार कुंडलवाडी जिल्हा नांदेड हे मयत झाले. या अपघातात तेजस गंगाधर मानोरे वय ३० राहणार चिबळी तालुका खेड जिल्हा पुणे पिंटू बाबूलाल गुप्ता व २८ राहणार पुणे नामदेव बालाजी वाडेकर व२९ तालुका खेड जिल्हा पुणे छाया मोहन चिरलेवाड व उपस्थित राहणार चिंबळी तालुका खेड जिल्हा पुणे यांना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले आहे जयश्री पिंटू गुप्ता वय २५ तालुका खेड जिल्हा पुणे सावित्रा हनुमंत बायबल वय ४० राहणार कुंडलवाडी जिल्हा नांदेड आकाश हनुमंत पाया वैधा राहणार कुंडलवाडी जिल्हा नांदेड ऋतुजा मोहन शिर्लेवाड वय तीन राहणार चिंबळी तालुका खेड जिल्हा पुणे श्रेयस गुप्ता व दोन वर्षे राहणार चिंबळी तालुका खेड जिल्हा पुणे हे गंभीर जखमी असून त्यांना पुढील उपचारासाठी सिविल हॉस्पिटल सोलापूर येथे दाखल करण्यात आले आहे

अक्कलकोट येथून देवदर्शन झाल्यानंतर नांदेड येथील भाविक आपल्या स्कॉर्पिओ वाहनातून मैंदर्गी मार्गे गाणगापूरला देवदर्शनासाठी जात होते. दरम्यान मैंदर्गीहून अक्कलकोटकडे येणाऱ्या आयशर ट्रकने स्कॉर्पिओला जोरदार धडक दिली.हा अपघात इतका भीषण होता की ज्यामध्ये स्कॉर्पिओचा चक्काचूर झाला. हा अपघात शाब्दिक पेट्रोल पंपाजवळ मिरजगी फाट्याजवळ घडला. या अपघातामध्ये दोन पुरुष आणि दोन महिला जागेवरच मृत्युमुखी पडले. तर आठजण गंभीर जखमी झालेले आहेत. या अपघाताची माहिती मिळतात दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी दाखल झाले. लोकांच्या मदतीच्या माध्यमातून जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नवीन वर्षानिमित्त देवदर्शनाला आलेल्या भाविकांच्या झालेल्या अपघातामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

या अपघाताचा पुढील तपास एपीआय सुरवसे हे करीत आहेत.

**दिवाळीपासून भाविकांची अक्कलकोट शहरांमध्ये श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होत आहे. येणारे भाविक पुढील देवदर्शनासाठी म्हणून तुळजापूर, पंढरपूर, गाणगापूर येथे जातात. अक्कलकोट ते गाणगापूर हा मार्ग मोठ्या वाहनाने सतत गजबजलेला असतो. ह्या रस्त्याच्यामध्ये डिव्हायडरची सोय केल्यास अशा अपघातांना आळा बसू शकतो.**

# संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



मुंबई : बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. यादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या सीआयडीकडून तपास सुरू असून आतापर्यंत दीडशेहून अधिक जाणांची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कोटींची खंडणी आणि हत्या या दोन्हींच्या संबंधाच्या अनुषंगाने तपास केला जात आहे. दरम्यान या प्रकरणात सीआयडीने आणखी तीन लोकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहे. पण हे तीन जण कोण आहेत? याबद्दलची माहिती अद्याप उघड करण्यात आलेली नाही. या हत्या प्रकरणातील काही आरोपी अद्यापही फरार आहेत, त्यांचा देखील शोध सीआयडीकडून घेतला जात आहे. पीटीआयने यासंबंधीचे वृत्त दिले आहे.

तसेच या प्रकरणात आरोप होत असलेल्या वाल्मिक कराड हा पुणे येथे पोलिसांना शरण आला आहे. त्याच्याविरोधात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला बीडमधील केजच्या न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाचे नेतृत्व आयपीएस बसवराज तेली, पोलीस उपमहानिरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, सीआयडी पुणे यांच्याकडे असणार आहे. तर तेली यांच्या नेतृत्वाखालील या विशेष तपास पथकात पोलीस उपअधीक्षक अनिल गुजर, सहायक पोलीस निरीक्षक विजयसिंग जोनवाल, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि पोलीस उपनिरीक्षक आनंद शंकर शिंदे यांच्यासह पोलीस सहायक पोलीस उपनिरीक्षक तुळशीराम जगताप, पोलिस हवालदार मनोज वाघ, पोलीस नाईक चंद्रकांत काळकुटे, पोलीस नाईक बाळासाहेब अहंकारे आणि पोलीस शिपाई संतोष गित्ते यांचा समावेश आहे.

वाल्मिक कराड हा मंगळवारी दुपारी स्वत:हून पोलिसांच्या स्वाधीन झाला. त्यानंतर संध्याकाळी त्याला पुणे पोलिसांनी केज पोलिसांच्या हवाली केलं. तिथे त्याला संध्याकाळी उशीरा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीनंतर त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी

**बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात असलेल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे ९ डिसेंबर रोजी अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. आरोपींनी एका पवनचक्की कंपनीकडे मागितलेली खंडणी देण्यास विरोध केल्याने त्यांची हत्या झाल्याचे सांगितले जाते. या प्रकरणात आरोप असलेला वाल्मिक कराड हा गेल्या काही दिवसांपासून फरार होता. वाल्मिक कराडनं मंगळवारी दुपारी अचानक एक व्हिडीओ जारी केला. या व्हिडीओमध्ये त्याच्यावरील सर्व आरोप त्याने फेटाळून लावले. तसेच, दाखल करण्यात आलेला खंडणीचा गुन्हाही अमान्य असल्याचं नमूद केलं. हा व्हिडीओ जारी केल्यानंतर पुढच्या तासाभरात तो पुण्यात सीआयडी पोलिसांच्या स्वाधीन झाला होता.**

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करणारा सायबर सेलच्या ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वादग्रस्त व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड केल्याप्रकरणी महाराष्ट्र सायबर सेलने वरद तुकाराम कणकी या संशयिताला ताब्यात घेतले आहे. याचबरोबर सायबर सेलला आणखी एक संशयित पद्माकर आंबोळकर याची ओळख पटली असून, त्यालाही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. हे दोन्ही संशयित मुंबईतील वरळी भागातील आहेत. सायबर सेल त्यांची राजकीय पार्श्वभूमी आणि इतर संभाव्य संशयितांची चौकशी करत आहे. दरम्यान या प्रकरणात आधीच एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा छेडछाड केलेला आणि अपूर्ण व्हिडिओ शेअर केल्याप्रकरणी महाराष्ट्र राज्य सायबर विभागाने गेल्या आठवड्या १२ सोशल मीडिया युजर्सविरोधात गुन्हा दाखल केला होता. सायबर सेलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले होते की, व्हिडिओचा कंटेंट सामाजिक अशांतता भडकवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला होती. यामुळे विशिष्ट गटांच्या भावना दुखावल्यास महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती बिघडू शकते.

# ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या ८१३ व्या उरुस निमित्त अजमेर दर्ग्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी पाठवणार चादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्या ८१३ व्या उरुस र्निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी अजमेर शरीफ दर्ग्याला चादर पाठवणार आहेत. गुरुवारी संध्याकाळी ६ वाजता केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू आणि भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांच्याकडे पंतप्रधान मोदी औपचारिक चादर सुपूर्द करतील. या सोहळ्यासाठी पंतप्रधान मोदी दरवर्षी दर्ग्याला चादर पाठवतात.

२०१४ मध्ये देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्यापासून नरेंद्र मोदी यांनी अजमेर शरीफ दर्ग्याला दहा वेळा चादर अर्पण केली आहे. आता अकराव्या वेळी ते अजमेर शरीफ दर्ग्याला चादर पाठवणार आहेत. गेल्या वर्षी, ८१२ व्या उरुस निमित्त, पंतप्रधान मोदींच्या वतीने तत्कालीन केंद्रीय मंत्री स्मृती इराणी आणि जमाल सिद्दीकी यांच्यासह मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिष्टमंडळाने दर्ग्याला चादर अर्पण केली होती. ख्वाजा गरीब नवाज यांच्या दर्ग्याला (मझार-ए-अख्दास) चादर अर्पण करणे भक्ती आणि आदराचे प्रतीक आहे. उरुस दरम्यान चादर अर्पण करण्याची ही प्रथा गेल्या अनेक शतकांपासून सुरू आहे.

अजमेर शरीफ दर्गा भारतातील सर्वाधिक मानल्या जाणार दर्ग्यांपैकी एक आहे. दरवर्षी, ख्वाजा मोईनुद्दीन हसन चिश्ती यांच्या पुण्यतिथीच्या स्मरणार्थ उरुस उत्सव साजरा करण्यासाठी जगभरातील लाखो भाविक येथे येत असतात. हजरत ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा ८१३ वा उरुस २८ डिसेंबर २०२४ रोजी सुरू झाला आहे.

अजमेर दर्गा शरीफ येथील ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांचा ८१३ वा उरूस सुरू होण्यापूर्वी गेल्या आठवड्यात, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीही चादर पाठवली होती. खादिम सय्यद जिशान चिश्ती यांच्याकडे ही चादर सुपूर्द करण्यात आली होती.

अजमेरपासून सुरू होणाऱ्या सुफी कॉरिडॉरचे उद्दिष्ट हे देशभरातील सुफी देवस्थानं किंवा दर्गा यांना आधार देणे आणि चांगल्या पायाभूत सुविधा निर्माण करणे आहे. अजमेर दर्गा भारताच्या सांस्कृतिक कूटनीतीचाही एक भाग आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनीही दर्ग्यावर चादर अर्पण केली आहे.

केंद्र सरकारची शेतकऱ्यांना नववर्षाची भेट

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली माहिती

# केंद्रीय मंत्रिमंडळाने डीएपीसाठीच्या विशेष पॅकेजला मंजूरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: केंद्रीय मंत्रिमंडळाने डीएपीसाठी (डायअमोनियम फॉस्फेट ) असलेल्या विशेष पॅकेजच्या विस्तारास मान्यता दिली आहे. आजपासून ( दि. १ जानेवारी २०२५ पासून) या पॅकेजची अंमलबजावणी केली जाणार आहे. तब्बल ३८५० कोटी रुपये या पॅकेजसाठी दिले जाणार आहेत. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात डीएपीची उपलब्धता सुनिश्चित करणे या पॅकेज विस्ताराचा उद्देश आहे.

या पॅकेजनुसार, शेतकऱ्यांना सध्याच्या NBS (न्यूट्रिएंट बेस्ड सबसिडी) या योजनेसोबतच प्रति टन ३ हजार ५०० रुपये प्रतिटन अनुदान मिळणार आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सरकारच्या या महत्वपूर्ण पॅकेज विस्तारासंबंधी माहिती दिली.

या पॅकेजबद्दल बोलताना केंद्रीय मंत्री वैष्णव म्हणाले की, 'आंतरराष्ट्रीय बाजारामधील चढउतार आणि सामरिक तणावामुळे हे पाऊल उचलण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना स्वस्तामध्ये डीएपी खत मिळत राहणार आहे. ३,५०० रुपये प्रति टन हे विशेष पॅकेज छइड (एनबीएस) अनुदानाव्यतिरिक्त दिले जाईल.



डीएपीच्या किंमती स्थिर राहतील सरकारचा विश्वास

या पॅकेज विस्ताराच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना लागणारी खते ही परवडणाऱ्या दरात उपलब्ध होणार आहेत. या विशेष पॅकेजमुळे बाजारामध्ये डीएपीच्या किंमती स्थिर राहतील असा सरकारने विश्वासही व्यक्त केला आहे. या पॅकेजची अंमलबजावणी आजपासून सुरु झाली असून पुढील आदेश मिळेपर्यंत पॅकेजचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे.

डीएपीए सह सुमारे २८ प्रकारच्या खतांवर अनुदान

एप्रिल २०१० पासून म्हणजे तत्कालिन संयुक्त पूरोगामी आघाडी सरकार-२ च्या काळापासून छइड योजनेंतर्गत शेतकऱ्यांना डीएपीए सह सुमारे २८ प्रकारच्या फॉस्फेटिक आणि पोटॅसिक (झघ) खतांवर अनुदान दिले जात आहे. सरकारकडून तब्बल १४ वर्षे हे अनुदान दिले जात आहे.

या अगोदर जुलै २०२४ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने १ एप्रिल २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीकरिता डीएपीएसाठी २,६२५ कोटी रुपयांचे विशेष पॅकेज मंजूर केले होते.

या नव्या पॅकेजमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. पीक उत्पादनासाठी लागणारी खते माफक दरात उपलब्ध होणार आहे तसेच त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊ शकते. वर्षाच्या सुरुवातीलाच सरकारने घेतलेला हा निर्णय कृषी क्षेत्राकरिता अत्यंत महत्वाचा निर्णय ठरला आहे.

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरास ५३ कोटी ९७ लाखाचे दान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली माहिती**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस दिनांक ०१ जानेवारी ते २७ डिसेंबर २०२४ या कालावधीत ५३ कोटी ९७ लाखाचे प्राप्त झाल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्यामध्ये श्रींच्या चरणाजवळ ६२५८९७९७/-, लाडूप्रसादातून ५८५२६९००/-, देणगीतून ८१८९८४१७/-, भक्तनिवासातून ९८४७८२७९/-, पुजेतून २३३८६३१२/-, फोटो, मोबाईल लॉकर व महावस्त्रातून ९२३३०४९/-, हुंडीपेटीतून ७५६७४०५२/-, सोने-चांदीमधून २७२०४४५०/- परिवार देवता मंदिरातून ३०९१४२०३/-, विधि उपचारातून ५९८८४३७/- तसेच इतर जमेतून ६५८११८५६/- असे एकूण ५३ कोटी ९७ लाख ५ हजार ७५२ रूपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने दर्शनरांग व्यवस्थापन, अन्नछत्र, लाडूप्रसाद, निवास इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांना श्रींच्या नित्यपुजा, पाद्यपुजा व तुळशीपूजा देखील भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या पायांना खडे टोचू नये म्हणून दर्शनरांगेत मॅटींग, विश्रांती कक्ष, आपत्कालिन दरवाजे, हिरकणी कक्ष, मोफत अन्नछत्र, एकादशीला शाबुदाणा खिचडी वाटप, द्वादशीला तांदळाची खिचडी, मिनरल वॉटर, चहा, आरोग्य व्यवस्थेचे स्टॉल इ. उपक्रम मंदिर समितीने सुरू केले आहेत. तसेच श्रींच्या पुजेसाठी वाढती मागणी विचारात घेऊन, नित्यपुजेत २ भाविक कुटुंबियांना संधी, अन्नछत्र सहभाग योजना, महानैवेद्य सहभाग योजना, तुळशी अर्चन पुजा सुरू केल्या असून, त्याची नोंदणी देखील ऑनलाईन करण्यात आली आहे, यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

मंदिर समितीस वारकरी भाविकांकडून चांगले दान मिळत असून, मिळालेल्या दानातून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या वारकरी भाविकांना चांगल्या व अत्याधुनिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न राहील असे यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### मुदतवाढीचा निर्णय

सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारीपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ३१ डिसेंबरपर्यंत ही मुदत होती. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि 'एनसीसीएफ' यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे. पणन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा नुकताच सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची तीन लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एवढी विक्रमी खरेदी झाली आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरू असून आतापर्यंत ६ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. शेतकऱ्यांना हमी भाव, तर ग्राहकांना रास्त दरात माल मिळाला पाहिजे यासाठी विभागाच्या माध्यमातून यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती असली पाहिजे यासाठी प्रयत्न केला जाईल. त्याअंतर्गत आदिवासी भागातील तालुक्यांवर भर देण्यात येईल, या भागात शेतमालाची खरेदी-विक्री करण्यासाठी व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले जाईल, अशी माहिती रावल यांनी दिली. पणन विभागामार्फत शेतकरी हिताचे धोरण आखण्यात येणार आहे. सोयाबीन, धान, कापूस यासारख्या पिकांना हमीभाव मिळवून देण्यासह कांद्यासारख्या नाशवंत पिकांना रास्त भाव मिळण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. त्यासाठी जगातील उत्तम बाजार व्यवस्थेचा अभ्यास करून तेथील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या राज्यात वापर करण्यात येणार आहे. बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यासह त्यांचे बळकटीकरण केले जाईल.

# आधुनिक भारतातील 'पहिला' बुद्धांचा पुतळा बडोद्यात उभारला गेला !

३१ ऑक्टोबर २०१८ रोजी जनतेसाठी खुला झालेला गुजरातमधील जगातील सर्वात उंच सरदार वल्लभभाई पटेलांचा पुतळा 'डींर्रींश ेष णपळीूं' (एकतेचे प्रतिक) म्हणून ओळखला जातो. शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर अनेक महापुरुषांच्या पुतळ्यांवरून समाजात घडून येणारी चर्चा प्रबोधनाऐवजी वाद अधिक वाढवताना दिसते. या महापुरुषांचे विचार जनतेच्या मनात रुजवण्याऐवजी त्यांचे 'दैवतीकरण' करण्यावरच अनुयायांचा भर असतो. परिणामी 'कुणाचा पुतळा अधिक उंच' या इर्षेतून बसवले जाणारे महापुरुषांचे पुतळे 'कर्मकांडे आणि राजकारणाचे हॉटस्पॉट' ठरतात. या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबर १९१० रोजी बडोद्याच्या ज्युबिली बागेत बुद्धाचा पुतळा बसवण्यापाठीमागची महाराजा सयाजीरावांची 'तात्विक' भूमिका आजही महापुरुषांच्या अनुयायांच्या डोळ्यात अंजन घालणारी आहे. बडोद्यातील बुद्ध पुतळा अनावरणाच्या निमित्ताने महाराजा सयाजीरावांची महापुरुषांच्या पुतळ्यांमागील भूमिका समजून घेणे समकालीन परिस्थितीत अत्यावश्यक ठरते.

३१ डिसेंबर १९१० रोजी बडोद्याच्या ज्युबिली बागेत बसवलेला बुद्धाचा पुतळा सयाजीरावांनी जपानहून आणला होता. या पुतळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या चबुतर्यावर बौद्ध धर्माची तत्वे कोरलेली होती. महापुरुषाचे विचार रुजवण्यासाठी हा अनोखा मार्ग सयाजीरावांनी अनुसरला. या पुतळ्याच्या अनावरण समारंभात केलेल्या भाषणात सयाजीरावांनी पुतळा बसवण्यामागची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या भाषणात सयाजीराव म्हणतात, ही मूर्ती जपानहून मागविलेली आहे. मूर्ती आणण्याचा हेतू एवढाच की, महात्मा बुद्ध हिंदुस्थानात जन्मले होते. या गोष्टीचे स्मरण असावे: तसेच धर्माच्या आणि आचाराच्या दृष्टीने योग्य अशा सिद्धांताकडे आपल्या लोकांची दृष्टी जावी. आपल्या देशात जन्मलेल्या महापुरुषांच्या विचारांची 'आठवण' जनतेला राहावी यासाठी बुद्धाचा पुतळा बसवण्याची सयाजीरावांची 'दृष्टी' बौद्ध धर्माचे भारतातील अस्तित्व निष्प्रभ असतानाच्या काळाच्या पार्श्वभूमीवर क्रांतिकारक ठरते.

या समारंभातील महाराजांचे भाषण त्यांच्या बौद्ध तत्वज्ञानाच्या संतुलित आणि प्रगत आकलनाचा पुरावा आहे. या भाषणात महाराज म्हणतात, बुद्धाचे जीवन काय शिकविते याविषयी थोडी माहिती मी देतो. महात्मा बुद्धांच्या उपदेशाचे सार एवढे होते की, मनुष्याला चांगली स्थिती प्राप्त होणे, हे त्याचे नशीब किंवा दैवयोग यावर नसून खास त्याच्या पुरुषार्थावर अवलंबून आहे. आपण जसे कर्म करावे, जसा प्रयत्न करावा, त्याप्रमाणे लहानमोठे होऊ शकतो. बौद्ध सिद्धांताप्रमाणे ब्राह्मण-क्षत्रियादिवर्ण, गुणकर्मावर समजला जातो, जन्मावरून नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या अगोदर ४६ वर्षे सयाजीरावांनी 'बुद्ध आपल्याला का हवा आहे' याची केलेली कारणमीमांसा आजही तंतोतंत लागू होते.

१९१० च्या भाषणात ही कारणमीमांसा करण्याच्या खूप आधीपासून सयाजीरावांनी बडोद्यात आणि बडोद्याबाहेरदेखील बौद्ध तत्वज्ञानाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले होते.

१८९८ पूर्वीपासूनच सयाजीरावांचा बुद्धाशी चांगला परिचय होता. धर्माचा वैज्ञानिक दृष्टीने विचार करणाऱ्या सयाजीरावांनी १८९८ मध्ये बडोद्याच्या प्राच्यविद्या ग्रंथमालेत केळूसकर गुरुजीलिखित बुद्ध चरित्राचे प्रकाशन केले. हे आधुनिक काळातील कोणत्याही भारतीयाने लिहिलेले पहिले बुद्धचरित्र होते. केळूसकरांचे हे बुद्धचरित्र बुद्धाचा एक वैज्ञानिक दृष्टीचा महापुरुष म्हणून वेध घेते. या ग्रंथाचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक जीवनातील आणि धर्मांतराच्या निर्णयातील स्थान क्रांतिकारक होते.

१८९८ पासूनच आधुनिक महाराष्ट्राला बुद्धाचा परिचय करून देण्यास महाराजांनी सुरुवात केली होती. महाराष्ट्रात बौद्ध धर्म प्रसारात महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या धर्मानंद कोसंबींना सयाजीरावांनी राजाश्रय दिला होता. १९०८ ते १९११ अशी तीन वर्षे बौद्ध धर्माचा महाराष्ट्रात प्रसार आणि ग्रंथलेखन करण्यासाठी सयाजीरावांनी कोसंबीना दरमहा ५० रु. शिष्यवृत्ती दिली. १९०९ मध्ये महाराजांनी बडोद्यात कोसंबींच्या बौद्ध धर्मावरील ५ भाषणांचे आयोजन केले होते. त्यातील ३ भाषणे 'बुद्ध, धर्म आणि संघ' या नावाने छोट्या पुस्तिकेच्या स्वरूपात आज उपलब्ध आहेत. पुढे १९१० मध्ये धर्मानंदांना अमेरिकेत हार्वर्ड विद्यापीठात प्रा.वाटन यांच्या बौद्ध धर्मातील 'विशुद्धी मार्ग' या ग्रंथावरील संशोधनात सहकार्य करण्यासाठी बोलविण्यात आले. सयाजीराव महाराजांची परवानगी घेऊन कोसंबी १९१० मध्ये हार्वर्ड विद्यापीठात गेले. याच वर्षी महाराजांनी बडोद्याच्या ज्युबिली बागेत जपानहून आणलेला बुद्धाचा पुतळा बसवला. हा योगायोग 'अपूर्व' होता.

कोसंबींच्या अमेरिका वारीदरम्यानच महाराज जपानला निघाले होते. महाराज पुढे जपानवरून अमेरिकेला जाणार असल्याने कोसंबींना ते स्वतःबरोबर येण्याचा आग्रह करत होते. परंतु त्यांची प्रवासाची व्यवस्था हार्वर्ड विद्यापीठाने केली असल्याने ते स्वतंत्रपणे अमेरिकेला गेले. महाराजांच्या परवानगीमुळेच शक्य झालेली ही अमेरिका वारी बौद्ध धर्माच्या कामासाठी व त्यांचा मुलगा दामोदर यांच्या शिक्षणासाठी फलदायी ठरली.

१९१२ मध्ये अमेरिकेहून परतल्यानंतर धर्मानंदांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये इतर प्राध्यापकांपेक्षा दरमहा २५ रु. कमी वेतनावर पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्वीकारली. याच दरम्यान महाराज मुंबईत आले असता कोसंबींनी भेट घेवून सर्व वृत्तांत सयाजीरावांना कथन केला. कमी पगारावर नोकरी स्वीकारल्याबद्दल सयाजीराव त्यांना रागावले. याचवेळी फर्ग्युसन कॉलेजमधील पाली भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याची कोसंबीनी केलेली विनंती मान्य करून महाराजांनी दर महिन्याला पंधरा रुपयांच्या दोन आणि दहा रुपयाच्या दोन अशा चार शिष्यवृत्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये सुरू केल्या. या चार शिष्यवृत्या १९१२ ते १९१८ या कालावधीत कोसंबी या कॉलेजमध्ये नोकरीत असेपर्यंत चालू राहिल्या. विशेष म्हणजे पाली भाषा शिकवणारे फर्ग्युसन कॉलेज हे तत्कालीन मुंबई प्रांतातील एकमेव कॉलेज होते. सयाजीरावांनी दिलेल्या शिष्यवृत्त्यांमुळेच फर्ग्युसन कॉलेज आपल्या विद्यार्थ्यांना पाली भाषा शिकवू शकले.

१९३० पासून महाराजांनी बडोदा कॉलेज आणि बडोदा हायस्कूल या दोन ठिकाणी पाली भाषा शिकवण्याची व्यवस्था केली होती. कोसंबींचे फर्ग्युसन कॉलेजमधील विद्यार्थी चिंतामण वैजनाथ राजवाडे हे बडोदा कॉलेजमध्ये पाली भाषेचे पहिले प्राध्यापक होते. औपचारिक शिक्षणात पाली भाषेचा समावेश करतानाच सयाजीरावांनी विविध बौद्ध धर्मविषयक ग्रंथांचे प्रकाशन करून जनतेचे आकलन वाढवण्यावर भर दिला. कोसंबींचे विद्यार्थी असणाऱ्या चिंतामण वैद्यनाथ राजवाडे यांच्याकडून महाराजांनी बडोदा संस्थानसाठी बौद्ध धर्मावरील दोन पुस्तकांचे मराठी भाषांतर करून घेतले. महाराजांनी प्रकाशित केलेले बौध्द धर्मासंदर्भातील केळुसकरलिखित 'गौतम बुद्ध चरित्र' (१८९८), रामचंद्र नारायण पाटकरलिखित 'बौध्दधर्म अर्थात धर्मचिकित्सा' (१९३२), रामराव मार्तंड भांबुरकरलिखित 'भगवान बुध्दचरित्र व धर्मसार संग्रह' (१९३४), ना. गो. कालेलकरलिखित 'बुद्धकालीन भारतीय समाज' (१९३६) यांसह मराठी भाषेतील ६ व इंग्रजी भाषेतील १३ असे एकूण १९ ग्रंथ त्यांनी राबवलेल्या बौद्ध तत्वज्ञान साक्षरतेच्या महाप्रकल्पाची साक्ष देतात.

१८८५ मध्ये महाराजांच्या आश्रयाने बडोद्यात 'बडोदावत्सल' साप्ताहिक सुरु करणाऱ्या दामोदर सावळाराम यंदे यांना पाली भाषेतील बौद्ध ग्रंथांचे मराठी अनुवाद अग्रक्रमाने प्रकाशित करण्याची सूचना सयाजीरावांनी केली होती. महाराजांच्या धर्मविषयक भाषणात बुद्धाचा गौरवाने उल्लेख वारंवार आढळतो हा अपघात नाही. 'महात्मा' बुद्धाचे प्रशंसक असणाऱ्या सयाजीरावांनी २७ मार्च १९३४ रोजी मुंबई येथील डॉ. नायर यांच्या बुद्ध विहाराचे उद्घाटन केले.

आधुनिक भारतात बौद्ध धर्माला राजाश्रय देणारे सयाजीराव एकमेव प्रशासक होते. केळूसकरांचे बुद्धचरित्र वाचून बौद्ध धर्म स्वीकारलेले मुंबईचे ए.एल. नायर आधुनिक भारतात बौद्ध धर्माच्या पुनरुज्जीवनात सयाजीरावांचे असणारे स्थान अधोरेखित करताना म्हणतात, But my admiration for His Highness is still further intensified by the fact that long before this renaissance of Buddhism in India, His Highness had taken great interest in Bhagawan Buddha, and showed the greatest love for him. बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन करताना या धर्माबाबत एकांगी प्रबोधन होऊ न देण्याची काळजी सयाजीरावांनी जाणीवपूर्वक घेतली. त्यामुळेच हिंदूबहुल बडोदा संस्थानात शांततापूर्ण मार्गाने बौद्ध धर्म 'रुजू' शकला. धार्मिक सुधारणा करताना सयाजीरावांनी घेतलेली ही काळजी आजच्या भारतीय समाजासाठी 'आदर्शवत' आहे.

आधुनिक भारतात सर्वप्रथम सयाजीरावांनी बडोदा संस्थानात बुद्ध जयंती साजरी करण्यास सुरुवात केली. सयाजीराव महाराजांनी त्यांच्या अभ्यासिकेत अभ्यासाच्या टेबलावर बुद्धांची मूर्ती ठेवली होती. स्वतःच्या अभ्यासिकेपासून सार्वजनिक बागेत बसवलेल्या बुद्धाच्या पुतळ्यांना सयाजीरावांनी दिलेले तात्विक अधिष्ठान आजच्या भारतीय समाजासाठी अनुकरणीय आहे. आधुनिक भारतात बौद्ध धर्माला राजाश्रय देणारे पहिले प्रशासक म्हणून सयाजीरावांचे असणारे योगदान आजअखेर अज्ञात आहे. आधुनिक काळातील भारतातील बौद्ध धर्माचा इतिहास बडोदाकेंद्री दृष्टीकोनातून नव्याने लिहिल्याशिवाय सयाजीरावांच्या विचार, कृती आणि दृष्टीतील क्रांतीकारकता आपल्याला कळणार नाही. म्हणूनच आजच्या दिवशी या बाबींचे पुनर्वाचन अनिवार्य ठरते.

**– स्नेहा मंगसुळीकर, वारणानगर**
(९६७३०८४८२३)

## फसवणूक करण्याचा प्रयत्न ; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) बनावट सोन्यासारखा दिसणारा नकली हार महिलेस देऊन त्यांच्याकडून पन्नास हजार रुपये घेण्याचा प्रयत्न करून फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याची घटना २७ ते ३१ डिसेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी दीपा आनंद टुमणे (वय-३६,रा.सागर चौक,विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अण्णाराम बापूजी सोलंकी (रा.मद्रासिली ता.भिनमाल जि.जलोर राजस्थान), करण सेलाराम परमार (वय-१९,रा.ओढा,तालुका शेवगंज जिल्हा शिरोई), दरगाराम पागाराम (वय-३९,रा.बेरा पिपलीया रामसिन,ता.भिनमाल, जि.जलोर,राजस्थान) व लखाराम सुनाजी दाबी (रा.भागल ता.भिनमाल,जि.जलोर,रा. राजस्थान) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिवे हे करीत आहेत.

## पूर्ववैमनस्यातून मारहाण ; सहा जणांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) पूर्ववैमनस्यातून मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १ जानेवारी २०२५ रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास सिद्धार्थ हौसिंग सोसायटी येथे घडली.याप्रकरणी सीमा विलास गायकवाड (वय-३५-,रा.सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रमोद रामचंद्र गायकवाड, प्रेसेनजीत उर्फ लकी प्रमोद गायकवाड,हर्षजीत उर्फ विकी प्रमोद गायकवाड,पुतण्या सोन्या उर्फ संजय देवेंद्र गायकवाड,मनोज राजू अंकुश व सनी निकंबे (सर्व.रा. सिद्धार्थ हौसिंग सोसायटी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या घराशेजारी राहणारे शिरसे व शिवशरण यांच्यासोबत जुने भांडण झाल्याचा राग मनात धरून वरील संशयित आरोपी सनी निकंबे व प्रमोद गायकवाड यांनी सोबत दारू पिऊन अंगावर येऊन आदित्य दावणे याला प्रमोद गायकवाड याने पट्ट्याने मारून भांडण सुरू केले. त्यानंतर फिर्यादी व फिर्यादी यांचे मुले सुमित व रितेश गायकवाड यांना व तसेच भांडण सोडवायला आलेले निलेश शिरसे,सागर शिरसे, वैभव वाघे यांना लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने जिवे मारण्याच्या उद्देशाने मारहाण केली.तसेच वैभव वाघे याला गंभीर दुखावत केली.असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.पाटील हे करीत आहेत.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त भैरवनाथ विद्यालयात शालेय वस्तू वाटपाचा उपक्रम!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अकोले (प्रतिनिधी): महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त चास येथील भैरवनाथ विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी वृत्तपत्र विक्रेत्यापासून दैनिक संपादका पर्यंतचा दैदिप्यमान प्रवास केला असून, महाराष्ट्रातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित भैरवनाथ विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

वह्यांचे वितरण कार्यक्रम सरपंच सौ. सुरेखाताई शेळके, उपसरपंच सचिन शेळके, रामदास शेळके, सेवानिवृत्त शिक्षक कारभारी शेळके गुरुजी, प्राचार्य सुनील चौधरी, व रोटरी क्लबचे संस्थापक अध्यक्ष अमोल वैद्य यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य सुनील चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन भारत शेळके यांनी तर आभार प्रदर्शन गोपीचंद लेंडे यांनी केले. या प्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या सामाजिक कार्याबद्दल चास ग्रामस्थ व विद्यालयाच्या वतीने त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# विद्यार्थ्यांना कौशल्य विकास आधारित शिक्षण द्यावे : सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : कौशल्याधारित काम करणाऱ्या मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असल्याने बार्टीने विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास आधारित शिक्षण द्यावे त्यासाठी कौशल्याधारित अभ्यासक्रमाचे आयोजन करावे अशी सूचना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) येथे आयोजित समाज कल्याण विभागाच्या बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक इंदिरा अस्वार, विभाग प्रमुख स्नेहल भोसले, उमेश सोनवणे, रवींद्र कदम, शुभांगी पाटील आणि समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी बार्टीच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या संस्था राबवित असलेले अभ्यासक्रम व प्रशिक्षण, समाज कल्याण विभागातील रिक्त पदे यांचा आढावा घेतला.

समाज कल्याण विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती या वेळेतच विद्यार्थ्यांना मिळाव्यात, शिष्यवृत्ती पासून कोणी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, मागासवर्गीय समाजाला हक्काची घरे उपलब्ध करून देण्यासाठी रमाई योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना विना विलंब मिळावे यासाठी सुलभ कार्यपद्धती राबवावी आणि जात पडताळणी प्रमाणपत्र लवकर मिळेल याची दक्षता घ्यावी अशी सूचनाही श्रीमती मिसाळ यांनी केली.

बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी बार्टीच्या कामकाजाची तसेच राबविण्यात येणाऱ्या योजना आणि उपक्रम याची माहिती दिली. बैठकीला बार्टी तसेच समाज कल्याण विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पुरंदर तहसील कार्यालय येथे ग्राहक जनजागृती सप्ताहनिमित्त ग्राहक प्रबोधन कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुरंदर/प्रतिनिधी : ग्राहक कल्याण फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य व पुरंदर तालुका कार्यकारिणी व तहसील कार्यलय पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने २४ डिसेंबर राष्ट्रीय ग्राहक दिना निमित्त ग्राहक जनजागृती सप्ताह अनुषंगाने तहसील कार्यालय पुरंदर सासवड येथे ग्राहक प्रबोधन कार्यशाळा घेण्यात आली.

ग्राहक संरक्षण कायदा गरज व अंमलबजावणी णी या विषयावर माननीय इंद्रजीत देशमुख सर मा आयुक्त महाराष्ट्र शासन यांनी उपस्थित ग्राहक चळवळीतील सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, ग्राहक यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितलं की चळवळ जर उभी करायची असेल पहिल्यांदा त्याचा प्रचार झाला पाहिजे,प्रचारानंतर त्या लोकांचं योग्य असं प्रबोधन झालं पाहिजे,आणि त्याच्यानंतर प्रतिबंधक कारवाई यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे,अशा अनेक गोष्टी ग्राहक चळवळ विषयी त्यांनी उपस्थित कार्यकर्ते,पदाधिकारी व ग्राहक यांना सांगितल्या या कार्यक्रम प्रसंगी मा. वर्षा लांडगे उपविभागी अधिकारी पुरंदर, या प्रमुख उपस्थितीमध्ये उपस्थित होत्या.

तसेच मा.विक्रम राजपूत साहेब तहसीलदार पुरंदर, तसेच सुरज जाधव साहेब तालुका कृषी अधिकारी,श्री पाटील साहेब नायब तहसीलदार पुरंदर, ह भ प तुकाराम महाराज निंबाळकर, व ग्राहक कल्याण फाऊंडेशनचे पुरंदर तालुका सर्व कार्यकारणी तसेच असंख्य ग्राहक,रेशनदार संघटना,पत्रकार बांधव या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### जुन्या भांडणाचा राग मनात धरून तरुणास मारहाण; आठ जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : जुन्या भांडणाचा राग मनात धरून तरुणास व त्याच्या मित्राला मारहाण केली. तसेच फिर्यादी यांना चाकू, तलवार, कुऱ्हाड, लोखंडी साखळी अशा हत्याराने जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.




ही घटना ३१ डिसेंबर रोजी दुपारी तीन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास नीलकंठ बँक समोर घडली.याप्रकरणी सुरज रामू धोत्रे व २९ (रा.अविनाश नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सागर शैलेश बेळमकर, बालाजी रमेश वड्डेपल्ली, राहुल वासुदेव कोडी, मन्या अलकुंटे, अक्षय पवार, सागर शिंदे, बाबू धोत्रे व लल्या यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे हे करीत आहेत.

# सात वर्षापासून कार्यरत श्री विठ्ठल मंदिरे समिती बरखास्त करा : अर्जुनराव चव्हाण

## वाढत्या लोकसंख्येचा विचार करून समितीमध्ये सदस्य संख्या वाढवावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीला सात वर्षे होऊन सुद्धा सदरची समिती बरखास्त करण्यात आली नसून जुने सदस्य भाविकांना सेवा देण्यात कमी पडत असून भाविकांना कमी वेळात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी तसेच भाविकांच्या दर्शन रांगेसोबत इतर सुविधांना प्राधान्य देऊन काम करणारी नवीन समिती नियुक्ती करावी अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्र शासन स्थापित श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती बरखास्त करावी आणि सदस्य संख्या वाढवावी अशी मागणी केली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल रुक्मिणी मातीचे दर्शन घेण्यासाठी पंढरीनगरीत दररोज हजारो भावीकभक्त महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, गुजरात, राजस्थान येथून येत असतात. तसेच आषाढी व कार्तिक वारीला लाखों वैष्णवांची मांदीयाळी या भूवैकूंठ नगरीमध्ये अवतरते.

या ठिकाणी आलेला भाविक प्रथम चंद्रभागेचे स्नान करून विठ्ठल दर्शन करून प्रदक्षिणा मार्गावर प्रदक्षिणा पूर्ण करून वारी पोहोच करत असतो, ही परंपरा परंपरेने आजही सुरू असून या ठिकाणी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांच्या सोयी, सुविधांसाठी शासन स्थापित मंदिरे समिती सदैव कार्यरत असते. सध्या अस्तित्वात असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीला स्थापन करून ७ वर्ष पूर्ण झाली आहेत. आता ही समिती बरखास्त करावी आणि वाढत्या लोकसंख्येचा विचार करून या समितीमध्ये सदस्य संख्या वाढविण्याची तरतूद करावी. जर सदस्य संख्या वाढवली तर येणाऱ्या वारकरी भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी योग्य निर्णय घेतला जाईल सुलभ आणि वेळेत दर्शन होण्यासाठी नियोजन करण्यात येईल तसेच मंदिर समितीकडे अनेकांनी विविध बाबतीत मागणी केली आहे. यावर अद्यापही विचार केला जात नाही. त्या सर्व बाबींवर विचार करण्याचा निर्णय घेता येईल तसेच अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांना या समितीवर नियुक्त करून सेवेची संधी देता येईल. अशी मागणी करणारे पत्र पंढरपूरचे प्रांत अधिकारी सचिन इथापे यांना मराठा महासंघाच्या वतीने देण्यात आले.




यावेळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मोरे, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष हनुमंत कदम, महिला जिल्हाध्यक्ष प्रभावती गायकवाड मॅडम, पंढरपूर शहराध्यक्ष अमोल पवार, तालुकाध्यक्ष संतोष जाधव, शहर उपाध्यक्ष शामराव साळुंखे, शहर संघटक काका यादव, विभाग प्रमुख पांडुरंग शिंदे, रिक्षा संघटना अध्यक्ष नागेश गायकवाड, व्यापार उद्योग आघाडी अध्यक्ष नानासो शिंदे, शिक्षक आघाडी तालुका उपाध्यक्ष सोमनाथ बागल तसेच शहर सचिव सचिन थिटे, अमोल सुरवसे सह अ.भा.मराठा महासंघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंदिर समितीच्या अन्नछत्रासाठी एक लक्ष रुपयाची देणगी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस दत्तारावा दामू फुलसुंदर यांनी एक लक्ष रुपयेची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

या देणगीदाराचा सन्मान मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व सेवक सुधाकर घोडके उपस्थित होते. देणगीदार हे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे निस्सिम भक्त असून, दरवर्षी श्रीच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे येत असतात. मागील दोन वर्षापासून त्यांनी प्रत्येक वेळी एक लक्ष रुपयेची देणगी दिली आहे. संबंधित देणगीदार ठाणे येथील रहिवासी असून, प्रत्येक वर्षी आपल्या जमापुंजीतून मंदिर समितीस दान करीत असतात. सदरची देणगी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रासाठी दिली आहे. या अन्नछत्रामध्ये दैनंदिन दुपारी १२ ते २ व रात्री ७ ते ९ या वेळेत भाविकांना मोफत अन्नदान करण्यात येते. त्याचा सुमारे दैनंदिन ३००० भाविक लाभ घेतात.

# आ. अभिजीत पाटील यांनी घेतली ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरेची भेट

## माढा शहरातील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी निधी मिळावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसेभेचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे याची मुंबई येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे पत्र दिले. माढा येथे जिल्हा परिषद जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी आवश्यक निधी मिळावा याकरिता ग्रामविकास मंत्री ना.श्री.जयकुमार गोरे साहेब यांना निवेदन दिले.

**आमदार पाटील यांची मागणी**

माढा शहरामधील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये २मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व अनेकांना रोजगार उपलब्ध होईल.

तसेच जागेतील आतील बाजुस क्लासरूम व शाळेसाठी वॉल कंपाऊंड तयार करणे ही गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी मंजुर करण्यात यावा,अशी मागणी केल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/(जि.मा.का) : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधुन आणि राज्यातील वाचन संस्कृती वृध्दीगंत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.०१ जानेवारी २०२५ ते दि.१५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अनोखा उपक्रम राबविणेसाठी दि.२० डिसेंबर २०२४ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे.




या उपक्रमांतर्गत सामुहिक वाचन,कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा हे कार्यक्रम राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. नवीन वर्षाची सुरवात समाजातील सर्व घटकांतील तसेच नागरिकांनी आपल्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करुन करावी असे आवाहन मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य चंद्रकांत दादा पाटील यांनी केले आहे.

१ जानेवारी रोजी राज्यातील ६ हजार वर महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून या उपक्रमाच्या सुरुवातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या सभागृहामध्ये ग्रंथालयामध्ये सामुहिकरीत्या पुस्तकाचे वाचन सुरु केले आहे. यानिमित्ताने राज्यातील जवळजवळ ४५ लाखाच्या वर विद्यार्थ्यांच्या हातात विविध प्रकाराची पुस्तके दिसून आलेत.

येत्या १५ दिवसांत सदर पुस्तक वाचन पूर्ण करण्याचा संकल्प या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्यांने केला आहे. तसेच येत्या पंधरवडयात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढावे यासाठी वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक लेखकांना महाविद्यालयात निमंत्रितकरुन विद्यार्थी - वाचक- व लेखक या परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन पंधरवडा निमितीत्ताने महाविद्यालयांमध्ये पुस्तक परिक्षण स्पर्धा आणि पुस्तक कथन स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी करुन घेतले व वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी त्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकांची निवड करुन पुस्तकासंबंधीचे अभिप्राय १५ दिवसांच्या आत महाविद्यालयास सादर करण्यासंबधी सुचित केले आहे. त्यास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फुतपणे असा प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

**स्वेरीमध्ये ‘अवकाश महायात्रे’ चा समारोप**

**‘स्वेरीमध्ये‘विज्ञानभारती’ आणि‘इस्त्रो ‘यांच्या संयुक्त विद्यमाने ‘स्पेस ऑन व्हिल्स’ चे आयोजन**

# ‘विज्ञान भारती’आणि‘इस्त्रो यांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर : उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार





**स्वेरीमध्ये’विज्ञानभारती’आणि‘इस्त्रो’ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या अंतरीक्ष महायात्रेच्या समारोप प्रसंगी ‘स्पेस ऑन व्हील्स’ मधील अंतराळातील विविध उपग्रह तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर च्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ‘स्वेरीमध्ये‘विज्ञानभारती’ आणि‘इस्त्रो ‘यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ’स्पेस ऑन व्हिल्स’ या उपक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या अवकाशातील अदभूत माहितीमुळे विद्यार्थी प्रचंड उत्साही झाले. शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमातून अवकाशातील ग्रह, तारे यांविषयी पुस्तकी ज्ञान मिळत आहेच परंतु या ‘स्पेस ऑन व्हील्स (अंतरीक्ष महायात्रा बस)’ मधील प्रदर्शनामुळे विद्यार्थी आणि अवकाश अजून जवळ आल्यासारखे वाटत होते. या अंतरीक्ष महायात्रेच्या अनुषंगाने आयोजिलेल्या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडली.’ असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर मध्ये‘विज्ञानभारती’आणि ‘इस्त्रो’ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवस आयोजिलेल्या अंतरीक्ष महायात्रेच्या समारोप प्रसंगी स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार ह्या मार्गदर्शन करत होत्या. अंतराळातील महत्वाची माहिती देण्यासाठी भारतीय अंतराळ संस्थेने (इस्त्रो) मोहीम हाती घेतली असून केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्त्रोने अंतराळाच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी एक विशेष ‘अंतराळ यात्रा बस’ तयार केली असून बसच्या माध्यमातून चंद्र,सूर्य,ग्रह,तारे जवळून पाहण्याची अनुभूती घेत अंतराळाची वैज्ञानिक माहिती विद्यार्थ्यांना घेता आली. ‘अंतराळ यात्रा बस’मध्ये भारतीय ‘इस्त्रो’ तथा ‘अंतराळ संशोधन संस्था (इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन- इस्त्रो)’ च्या माध्यमातून अंतराळ व त्याअंतर्गत असलेल्या आर्यभट्ट उपग्रह, भास्कर उपग्रह,उपग्रहांच्या अनुषंगाने वातावरणात त्यांच्या फिरण्याच्या किंवा स्थिर राहण्याच्या कक्षा(ऑर्बिट), मंगळ ग्रह, चंद्र, चांद्रयान, ग्रहमालिका, चंद्रावर पाऊल ठेवणारा पहिला मानव, त्यावेळची स्थिती, चांद्रयानव मंगळयान मोहिमांबरोबरच सूर्यकेंद्री कक्षेत अवकाशयान पाठवून सूर्य किरणांमधील अतिनील वर्ण,सौर कण, सौर किरीट, सौर वात, चुंबकीय, सौर किरीट वर्णपटविश्लेषक, अतिनील किरणांची दुर्बीण, चुंबकीय प्रभाव मापक तसेच क्ष-किरणवप्लाझ्माकणयांचे विश्लेषण, त्यानंतर यशस्वी उड्डाण केलेल्या चंद्रयान-३ ची साहित्य व साधने, उपग्रहांची प्रतिकृती, तसेच चंद्रावरील मृदा, याची ध्वनी क्लिप, चित्रफित, सूक्ष्म उपगृह या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना दिसून आले. अवकाशातील हे सर्व उपगृह, त्यांची सविस्तर माहिती, फलक, भित्तीपत्रके, या बाबी पाहून विद्यार्थी प्रचंड उत्साही झाले होते. सलग दोन दिवस चाललेल्या या प्रदर्शनाचा लाभश्री. दर्लिंग विद्यामंदीर चळे, सिताराम महाराज विद्यामंदीर खर्डी, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, दौलतराव विद्यालय कासेगाव, जिजामाता प्रशालाआंबे, आचार्य दोंदे विद्यालय ओझेवाडी, लोटस इंग्लिश स्कूलकासेगाव, मातोश्री ईश्वरम्मा विद्यालयपंढरपूर, आपटे उपलप प्रशालापंढरपूर, मातोश्री सखुबाई कन्या प्रशालापंढरपूर, आदर्श प्रशाला व ज्युनिअर कॉलेजकरकंब, श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयमुंढेवाडी, मातोश्री रुक्मिणी गंगाराम होळकर विदयालय व्हळे, यशकिर्ती विद्यालयपंढरपूर, माध्यमिक विद्यालयनेपतगाव, जवाहरलाल नेहरू हायस्कूलसिद्धेवाडी, शांताप्रभू प्रशाला अजनसोंड, कवठेकर प्रशाला पंढरपूर या विद्यालयांतील जवळपास २५०० विद्यार्थी व शिक्षकांनी घेतला. यावेळी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलिटेक्निक) तर्फे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. ए.एस.भातलवंडे यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापकांच्या सहकार्याने अवकाश प्रदर्शन संबंधित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध या स्पर्धांचे आयोजन केले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली तसेच या दोन दिवसीय प्रदर्शनासाठी ‘विज्ञानभारती’, पश्चिम महाराष्ट्रचे सचिव कौस्तुभ साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली एमबीए विभागातील विद्यार्थ्यांना एक दिवसीय विशेष प्रशिक्षण दिले होते. त्यामुळे प्रदर्शन पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना एमबीए विभागप्रमुख डॉ.के.पी.गलानी यांच्या नेतृत्वाखाली ५५ विद्यार्थ्यांनी अंतराळ संबंधी अचूक माहिती दिली. ‘अंतराळ यात्रा प्रदर्शन’ यशस्वी होण्यासाठी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी. केने, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम. एस. मठपती, प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता डॉ.के.बी.पाटील, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

> **‘विज्ञानभारती’आणि‘इस्त्रो यांच्या सहकार्याने स्वेरीमध्ये आयोजिलेल्या अंतराळ माहितीच्या प्रदर्शनामुळे अवकाशातील कक्षा, उपग्रह, ताऱ्यांची सविस्तर माहिती मिळाली त्याची प्रतिकृती व व्हीडीओच्या माध्यमातून अधिक ज्ञान मिळाले. अभ्यासक्रमात वाचनात आलेले उपग्रह प्रदर्शनाच्या माध्यमातून जवळून पाहता आले. स्वेरीने आयोजिलेल्या या स्पर्धेमुळे ज्ञान आणखी भक्कम झाले.**
>
> **– नाझिया मुजावर,**
> **विद्यार्थिनी, छत्रपती शिवाजी विद्यालय, मुंढेवाडी.**

## थोडक्यात...

### हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर : हँडल लॉक करून ठेवलेली पन्नास हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर (क्रमांक एम एच १३ ०२३३) चोरून नेल्याची घटना २८ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी मौलाली उस्मानखाँ पठाण (वय-४६-,रा.दहिटणे) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

### बंद घराचे कुलूप तोडून ऐवज पळविला

सोलापूर : बंद घराचे कुलूप तोडून सुमारे ७० हजार ५८० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २४ ते ३० डिसेंबर रोजी घडली.याप्रकरणी अंबादास सायना येमुल (वय-४५,रा.न्यू पाछा पेठ,साईबाबा चौक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमावर गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवणे हे करीत आहेत.

# भीमा कोरेगाव शौर्य भुमीत बार्टी बुक फेअरला लाखो भीमसैनिकांनी दिली भेट

## विजयस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन, संविधान दालनामध्ये प्रदर्शन माहिती उपलब्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भीमा कोरेगाव : भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिनी ऐतिहासिक भीमा कोरेगाव विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी देशातील विविध राज्यातुन आलेल्या लाखो भीम अनुयायांनी अभिवादन केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री मा ना श्री संजय शिरसाट यांनी शौर्य दिनी भीम अनुयायांना प्रशासनाच्या वतीने अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून देण्यात यावे असे निर्देश दिले होते.

बार्टी संस्थेच्या वतीने प्रशासनाच्या सर्वच विभागाशी समन्वय साधून शौर्य दिनी अनुयायांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागाशी समन्वय साधण्यात आला होता .

बार्टीचे महासंचालक श्री सुनील वारे यांच्या संकल्पनेतून २०७ वा शौर्य दिन तसेच संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षा निमित विजयस्तंभाच्या पाठीमागे संविधान दालन छायाचित्र व बुक फेअरचे आयोजन करण्यात आले होते.

बुक फेअर मध्ये १५० बुक स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले.

संविधान दालनामध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची केलेली निर्मिती संविधानातील कलमे, मूलभूत अधिकार, कर्तव्य, छायाचित्राचे प्रदर्शन माहिती उपलब्ध करून देण्यात आली.

बार्टीच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जिवनावरिल मौल्यवान पुस्तके अल्प दरात उपलब्ध करून देण्यात आली संविधान ,संविधान उद्देशिका, ८५ %टक्के सवलतीच्या दरात अनुयायांना विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले . पुस्तके खरेदी करण्यासाठी भीम अनुयायांनी सकाळपासूनच बार्टीच्या बुक स्टॉल समोर रांगा लावून उभे होते.

विजयस्तंभास मानवंदना देऊन लाखो अनुयायांनी बुक फेअर तसेच संविधान दालनास भेट देऊन संविधानांतील कलम मूलभूत अधिकार कर्तव्य यांची माहिती घेतली. संविधान उद्देशिका ,व बार्टी माहिती पुस्तिका अनुयायांना विनामूल्य भेट देण्यात आली.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ यांनी विजयस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

पुणे जिल्हाधिकारी डॉ सुहास दिवसे, समाज कल्याणचे प्रभारी आयुक्त श्री प्रवीण पुरी, बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे, पुणे पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री जाधव, बार्टीच्या निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, रविन्द्र कदम, उमेश सोनवणे, शुभांगी पाटिल यांच्यासह बार्टी आणि सामाजिक न्याय विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



# 'बियरच्या बाटल्या रिकाम्या करण्यापेक्षा, रक्ताच्या बाटल्या भरूया' असा सामाजिक संदेश देत पडघ्यात रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

राज्यात रक्ताचा तुटवडा पडत असल्यामुळे सकारात्मक प्रतिसाद देत सानेगुरुजी समाजसेवी शिक्षक संघाच्या वतीने भिवंडी तालुक्यातील पडघा ग्राम पंचायत हॉल येथे 'बियरच्या बाटल्या रिकाम्या करण्यापेक्षा, रक्ताच्या बाटल्या भरूया' असा सामाजिक संदेश देऊन रक्तदान शिबिराचे आयोजन करून नवीन वर्षाचे स्वागत केले आहे.

सदर रक्तदान शिबिरचे उद्घाटन शिवसेना नेते प्रकाश पाटील, आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

पडघा ग्रामपंचायतचे सरपंच रविंद्र विशे असून प्रमुख म्हणून भिवंडी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले, उद्योजक पंडित पाटील, भिवंडी पंचायत समितीचे माजी उपसभापती गुरुनाथ जाधव, कृषी उपन्न बाजार समितीचे माजी सभापती डॉ. संजय पाटील, पडघा ग्रामपंचायत माजी सरपंच शैलेश बिडवी, पडघा ग्रुप सोसायटीचे माजी

**सानेगुरुजी समाजसेवी शिक्षक संघाचा उपक्रम**

सभापती श्रीकांत गायकर, तर आदी उपस्थित होते.

समाजातील चांगले कार्य करणा-या गुणीजनांचा सन्मान व्हावा म्हणून

सानेगुरुजी समाजसेवी शिक्षक संघाच्या वतीने यंदाचा सन्मान माणुसकीचा या पुरस्काराने दळेपाडा गावचे सुपुत्र दिनेश भोईर तर पडघा पोलिस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या पोलीस शिपाई निलम सातपुते यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

पडघा ग्रामपंचायत व छत्रपती शिवाजी शिवाजी महाराज कळवा रक्तपेढीचे सहकार्य लाभले. यावेळी पडघा विभागातील नागरीकांनी रक्तदान केले. ३१ डिसेंबर २०२४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करणाऱ्या साने गुरुजी शिक्षक संघाचे यावेळी पडघा परिसराच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले.

सानेगुरुजी समाजसेवी शिक्षक संघाच्यावतीने रक्तदान शिबिराचे यंदाचे चोविसावे वर्ष होते. सामाजिक बांधिलकीने वर्षाचा शेवट आम्ही करत असतो असे सानेगुरूजी समाजसेवी शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रशांत भोसले यांनी बोलताना सांगितले. सदर रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सानेगुरूजी समाजसेवी शिक्षक संघाचे संघाचे अध्यक्ष प्रशांत भोसले, कार्याध्यक्ष संतोष जोशी,सचिव प्रशात घागस, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर काठे, उपाध्यक्ष गणेश गायकवाड, खजिनदार विकास पाटकर, तर आदींनी मेहनत घेतली. यावेळी रक्तदान दात्याचे आभार व्यक्त करण्यात आले. सदर रक्तदान शिबिराचे सुत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.



# ठाकरेंना मोठा धक्का बसण्याची शक्यता; राजन साळवी पक्षाला रामराम करण्याच्या तयारीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई, (केतन भोज) : राजापूरचे विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राजन साळवी शिवसेना ठाकरे गटाला रामराम करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. राजन साळवी यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यास कोकणात ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. माजी आमदार राजन साळवी पक्षाला रामराम करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे. निवडणुकीत आणि निवडणुकीनंतर वरिष्ठ नेत्यांनी दखल न घेतल्याने राजन साळवी पक्ष सोडण्याच्या तयारीत आहे. शिवाय, कुटुंबियांच्या मागे पुन्हा एसीबीचा ससेमिरा लागण्याची राजन साळवी यांना चिंता आहे. त्यामुळे महिनाभरात राजन साळवी याबाबत निर्णय घेणार आहेत. राजन साळवी भाजप की शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार याबाबत सध्या चर्चांना उधाण आले आहे.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राजन साळवींचा पराभव-

राजापूर विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून किरण सामंत यांना उमेदवारी देण्यात आली होती, त्यांनी बहुमताने राजापुरात विजय मिळवला आहे. तर किरण सामंत यांच्या विरुद्ध उभे राहिलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या राजन साळवी यांचा पराभव झाला आहे.चौथ्यांदा राजापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते, मात्र २०२४ च्या निवडणुकीत राजन साळवी यांचा पराभव झाला आहे.





# गुरव समाजाचा महोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : गुरव विकास प्रतिष्ठान यांच्या वतीने महाराष्ट्रातील गुरव बांधवाचा दि. २९ रोजी महोत्सव पार पडला. यावेळी महाराष्ट्र पारंपरिक सांस्कृतिक लोककला लोकवाद्य तुतारी वादक श्री हरीदास गुरव यांनी कार्यक्रमाच्या सुरवातीला तुतारी आणि शंखनाद करुन पाहुण्यांचे व समाज बांधवांचे स्वागत करून गुरव विकास प्रतिष्ठान चे अध्यक्ष नवलजी शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली उपस्थित मान्यवर, डॉक्टर नितीन जी ढेपे, समाजताराचे संपादक लेखक - श्री भागवतजी गुरव, राष्ट्रीय पत्रकार - डॉक्टर राजेंद्र जी वाघमारे, वसई विरार, श्री अशोक मोरे (गुरव भाग २, पुस्तकाचे लेखक ), पंढरपूर चे पुजारी सुनील गुरव, नालासोपारा गुरव ज्ञाती समाज अध्यक्ष - श्री सोनुजी गुरव, जोडी जमली वधू वर सूचक मंडळाच्या अध्यक्षा - सौ.सुरक्षाताई साखरे, राजेन्द्र गुरव (औध-यमाई), डॉ श्रीकांत वाघ,विजय क्षिरसागर- अध्यक्ष अखिल महाराष्ट्र गुरव समाज ठाणे, संस्थापक माजी अध्यक्ष मधू पाटिल, अखिल महाराष्ट्र गुरव समाज ठाणे, गुरव ज्ञाती समाज माजी अध्यक्ष - श्री सुनील जी पवार, ज्योतिषाचार्य - श्री प्रविणजी राजगुरव, रविन्द्र क्षिरसागर, रमेश गुरव(दमण), या सर्वांच्या उपस्थितीत भगवान शिव पार्वती प्रतिमा, संत शिरोमणी संत काशीबा गुरव महाराज, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर याच्या प्रतिमेला पुष्पाहार आणि दीप प्रज्वळीत करून तसेच स्वागत गीतांने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक - गुरव विकास प्रतिष्ठान चे कार्याध्यक्ष श्री रवींद्रजी गुरव यांनी केले, त्यानंतर गुरव विकास प्रतिष्ठानची स्मरणीका चे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमातील प्रमुख अतिथी - डॉक्टर नितीन जी ढेपे, श्री मधुजी काका पाटील, श्री भागवत जी गुरव, ऍड. सुजाताई गुरव, सुरक्षाताई साखरे, श्री मंगेश जी गुरव, श्री पंढरपूर देवस्थानचे पुजारी सुनील जी गुरव, श्री विजयजी क्षीरसागर, श्री अशोकजी मोरे, बंडुजी खंडागळे, राष्ट्रीय गुरव समाज अध्यक्ष, माजी आमदार श्री विजयराजे शिंदे, श्री सुनीलजी पवार, श्री प्रविणजी राजगुरव, आमदार ऍड आशिषजी शेलार साहेब, श्री रमेशकाका राजगुरव, डॉक्टर - राजेंद्र जी वाघमारे, डॉ श्रीकांत वाघ, रविन्द्र क्षिरसागर, रमेश गुरव(दमण), सुहास आयरे ,अनुपमाताई गुरव आणि ईतर मान्यवर उपस्थित होते.

रायगड ठाणे मुंबई संस्थेचे पदाधिकारी -कार्यकर्ते आणि कर्तबगार अध्यक्ष बंडूजी खंडागळे यांच्या उपस्थितीने कार्यक्रम रंगतदार झाला. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रमोद गुरव सरचिटणीस यांनी उत्तम पार पाडले.

उद्योग-व्यवसाय आणि आपण यावर संत काशिबा महाराज युवक आर्थिक विकास महामंडळ अधिकारी आणि डॉ नितिन ढेपे सर यांचे मार्गदर्शन झाले.

संपादक भागवतराव गुरव, मधुजी पाटील, डॉ राजेन्द्र वाघमारे यांचे गुरव समाज एतिहासिक वारसा-परंपरा योगदान याविषयावर मार्गदर्शन झाले.

सौ सुरक्षाताई साखरे, सुजाताताई यांचे महिला सक्षमिकरण मार्गदर्शन झाले.

दुपारच्या भोजनानंतर विध्यार्थी गुणगौरव सोहळा, महिलांचा हळदीकुंकू समारंभ, कॅलेंडर २०२५ प्रकाशन, ऑनलाईन स्पर्धेमधील पसायदान स्पर्धा, देवस्थान रील, देवस्थान विडिओ, एकल नृत्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा सर्व स्पर्धाकांना सन्मानचिन्ह, प्रशिस्तीपत्र देऊन गौरवीण्यात आलं.

प्रमुख कलाकार - १९ झी लिटल चॅम्प कन्नड फायनलिस्ट गायक कुमार रेवणसिद्ध फुलारी, प्रसिद्ध वायोलीन वादक श्री जय शिंदे सर, सेक्सोफोन वादक - कुमारी मृणाल साळुंखे, तबला वादक - पंडित शरद दांडगे, या सर्वांचा स्टेज परफॉर्मन्स झाला त्यांना सन्मानीत करण्यात आले.

महाराष्ट्रातील गुरव समाजातील १५० पुजारी पेक्षा जास्त पुजारी, पुरोहित यांचा सन्मान करण्यात आला.

गुरव सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य नाशिक, राष्ट्रीय अध्यक्ष शंकर अण्णा कौदरे आणि सहकारी यांच्या वतीने गुरव विकास प्रतिष्ठाण चे अध्यक्ष श्री नवलजी शेवाळे यांच्या कार्याचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात गुरव समाजाचे संत शिरोमणी संत काशीबा महाराज गुरव यांच्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली.

शेवटी वै हभप सोनुबाबा कुर्णेकर पायीदिंडी सेवा भांबेड- वारकरी संप्रदाय ह. भ. प. संतोष बुवा कुर्णेकर महाराज यांच्या १०० साथीदारांच्या सुमधुर आवाजाने हरिपाठचे कथन करून सोहळ्याची सांगता झाली.

**मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन**

**सिरोली येथे अनावरण सोहळा संपन्न**

# पूर्णाकृती पुतळे जपण्यासाठी चळवळी जिवंत ठेवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अर्जुनमोरगाव : तमाम महाराष्ट्र राज्यात पुरोगामी वैचारिक जीवनाची खूप हाणी होत आहे. आंबेडकरवादी समाजाला याची जाणीव पाहिजे. आंबेडकरवादी समाज जागृत आहे. शिक्षित आहे. पण राजकारणासाठी भटकणारा आहे. अशाप्रकारे चळवळी भटकत आहेत. हे थांबून महामानवांचे पुतळे जपण्यासाठी चळवळी जीवंत ठेवा ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते सिरोली अनावरण सोहळ्याचे मुख्य मार्गदर्शक वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी विचार मंचावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणविर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कारमुर्ती रामकृष्ण शेंडे, प्रमोद मेश्राम, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आदे, कुरखेडा, डॉ. भारत लागे, यशवंत सोनटक्के, प्रदीप मस्के पत्रकार, अनिल दहिवले, कविता कापगते, भिमराव खोब्रागडे, यज्ञराज रामटेके, सरपंच नाजूक लसुंते, उपसरपंच सुधीर मेश्राम, मोहन साखरे, सतीश कोसरे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी तथागत भगवान बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई आंबेडकर आदी महामानवांच्या प्रतिमांना माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महात्मा ज्योतिबा फूले, सावित्रीबाई फुले व रमाबाई आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळे दान करणारे या सर्व दानदात्यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी भीमकन्या समुह व जी. प. प्राथमिक शाळा येथील विद्यार्थी यांनी समूह नृत्य सादर केले.

पुढे प्रा. नंदागवळी म्हणाले- समाजाने आता सजग रहावे. मानव, संविधान व शिक्षण धोक्यात आहे. शासन मागासवर्गीयांचे शिक्षण बंद करण्याचे काम करत आहे. याची जाणीव करून प्रत्येकाने आपले कर्तव्य जपावे. असे मार्मिक प्रबोधन केले.

अनावरण सोहळ्याचे प्रास्ताविक रमेश मेश्राम यांनी मांडले, संचालन शुभांगी हुमणे तर आभार श्री. खोब्रागडे यांनी मानले. यशस्वीतेसाठी विलास रामटेके, प्रकाश रामटेके, नवनिता मेश्राम, प्रतीमा डोंगरे यांनी सहकार्य केले.




# दोन विविध घटनात विवाहितांचा छळ; गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर शहरात दोन विविध घटनांमध्ये विवाहितांचा छळ करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन्हीही गुन्हे दाखल करण्यात झाले आहेत.

यात अधिक माहिती अशी की, न्यू सुनील नगर एमआयडीसी येथील वैष्णवी सागर बोगा (वय-२९, रा. १६५ न्यू सुनील नगर, एमआयडीसी) यांना सासरी नांदताना शारीरिक व मानसिक छळ करून जाचहाट करण्यात आला.तसेच आर्थिक त्रास दिल्याची घटना २६ नोव्हेंबर २०२१ ते १० जून २०२३ दरम्यान सासरी पुणे येथे घडली. या प्रकरणी पती सागर बोगा,सासरे भारत बोगा,सासू अन्नपूर्णा,दीर गोवर्धन,जाऊ राजश्री,नणंद माधुरी (सर्व रा. वाघोली बकोरी रोड पुणे) यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच दुसऱ्या घटनेत फिर्यादी या सासरी नांदताना शारीरिक व मानसिक छळ करून जाचहाट केला.तसेच आर्थिक त्रास दिला.याप्रकारणी मुबशिरीन सोहेल मजावर (वय-२०,रा. सितारा चौक,विजय नगर,नई जिंदगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती सोहेल,सासरे बाबुलाल,सासू नुरजहा, नणंद सना,नणंदचे पती मज्जिद शेख (सर्व रा.हैद्रा,ता. अक्कलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.